# **प्रेस नोट**

दि. २४/१२/२०२१

**ए.टी.एम. मशीनला स्कीमर लावून त्याव्दारे ग्राहकांचे पासवर्ड व डेटा चोरी करून लोकांच्या बॅंक खात्यामधुन पैसे काढणाऱ्या बल्गेरीयन भामटयास गुन्हे शाखेच्या कक्ष-७ कडून अटक.**

| | |
|---|---|
| कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-७, घाटकोपर, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा., गु.र.क्र.९५/२०२१, (गोरेगांव पोलीस ठाणे गु.र.क्र. ११०६/२०२१) कलम ४१९,४२० भांदवी सह कलम ६६ सी, ६६ डी माहिती तंत्रज्ञान कायदा . |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दिनांक २५/११/२०२१ ते २६/११/२०२१ च्या दरम्यान. |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक २९/११/२०२१ रोजी ठा.दै. क्रमांक. ५४/२१ वेळ १८.३६ वा. |
| घटनास्थळ | बॅंक ऑफ इंडिया, एस.व्ही.रोड शाखा, गोरेगाव-प.,मुंबई. |
| अटक आरोपीतांची संख्या | ०१ पुरुष |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | ८५०० EURO चलन (**भारतीय चलन ७,०५,५००/रुपये**), भारतीय चलन १४,५३०/-, लॅपटॉप, डेबीट कार्ड, ओटीजी/युएसबी केबल, कार्ड रिडर/राईटर, स्पीकर व वायर, **DEEP INSERT SKIMMER**. |

**थोडक्यात प्रेसनोट :-**

दि. ०६/१२/२०२१ व दि. ०७/१२/२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे हद्दीतील बॅंक ऑफ इंडीया शाखेतील काही खातेदारांच्या खात्यावरून अचानक पैसे काढले गेल्याने, त्यांनी वेगवेगळे तक्रारअर्ज नवघर पोलीस ठाणेस सादर केल्याची माहिती कक्ष कार्यालयास प्राप्त झाली होती. सदर माहितीची खात्री केली असता, बॅंक ऑफ इंडीया, मुलूंड पुर्व शाखेतील खातेदार यांचे खातेवरून पैसे काढले गेल्याचे समजले. म्हणुन पोलीस पथकासह बॅंक ऑफ इंडीया, शाखा-मुलूंड पुर्व यांचे मॅनेजर यांची भेट घेवुन सदर घटनेबाबत विचारपुस केली असता त्यांनी अशी माहिती दिली की, ज्या खातेदारांनी दिनांक ०४/१२/२०२१ रोजी त्यांचे नमुद शाखेतील एटीम मशीनमधुन पैसे काढलेले आहेत. त्यांचेच खात्यावरून दिनांक ०६/१२/२०२१ व दिनांक ०७/१२/२०२१ रोजी पैसे काढले गेलेले आहेत. सदरवेळी बॅंक ऑफ इंडीयाचे मॅनेजर यांचेकडुन दि.०४/१२/२०२१ रोजीचे फुटेज प्राप्त करून त्याची पाहणी केली असता, त्यामध्ये एक संशयित इसम १७.१५ वा. ए.टी.एम मशीनशी छेडछाड करत असताना दिसुन आला व त्याचा साथीदार हा एटीएमच्या समोरच्या रस्त्यावर उभा असल्याचे दिसुन आला. ए.टी.एम मशीनशी छेडछाड केल्यानंतर सदरचा इसम हा बाहेर उभा असलेल्या साथीदारास येवुन भेटला. त्यानंतर सदरचे दोन्ही इसमांचा शोध इतर सीसीटीव्ही फुटेज मध्ये घेतला असता, ते दोन्ही इसम मो. कारमध्ये बसुन गेल्याचे दिसले. सदर मोटार कारची माहिती घेवुन मोटार कार चालक याचेशी संपर्क साधुन चौकशी केली असता, त्याने नमुद दोन्ही इसमांना लालको रेसिडेन्सी हॉटेल, कल्पतरू इस्टेट, अंधेरी-पुर्व.,मुंबई येथे सोडल्याचे सांगितले.

केलेल्या तपासाचे/ माहितीच्या अनुषंगाने प्रभारी पोलीस निरीक्षक **श्री मनिष श्रीधनकर** यांच्या मार्गदर्शनाखाली कक्षातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमधील सर्व पोलीस ठाणेस संपर्क करून बॅंकेच्या ग्राहकांची फसवणुकीबाबत नोंद गुन्हयांची माहिती घेतली व त्याव्दारे वेगवेगळया ठिकाणच्या बॅंकेच्या ए.टी.एम. सेंटरचे सि.सि.टी.व्ही. फुटेज प्राप्त करून त्याबाबत तांत्रीक तपास केला असता, त्यामध्ये एक इसम त्याच्या साथीदाराच्या मदतीने ए.टी.एम मशीनशी छेडछाड करत असताना दिसुन आला. सदरबाबत गोरेगांव पोलीस ठाणेस गु. र.क्र. ११०६/२०२१ कलम ४२० भादवि सह कलम ६६ (क) (ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली.

दि. ११/१२/२०२१ रोजी केलेल्या तपासाचे/ माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथकाने लालको रेसिडन्सी हॉटेल, कल्पतरू इस्टेट, जे.व्ही.लिंक रोड, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी छापा टाकून बल्गेरीया देशाचा नागरीक असलेला SERGIEV VENTSISLAV DANCHOV यास ताब्यात घेतले. त्यांनतर त्याच्याकडे अधिक चौकशी केली तसेच नमुद गुन्हयाचा तांत्रीक तपास केला असता, सदर इसम हा त्याचा परदेशी साथीदार नामे EMIL VALKOV याचे सोबत एस.व्ही.रोड, गोरेगाव तसेच मुलुंड, नवघर याठिकाणी एटीएम मशीनला स्कीमर लावून ए.टी.एम. चा पासवर्ड व डेटा चोरून त्याव्दारे बॅकेच्या ग्राहकांचे पैसे काढत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गोरेगांव पोलीस ठाणेचा वर नमुद गुन्हा मा. वरिष्ठांचे आदेशाने गु.प्र.शा., गु.र.क्र. ९५/२०२१ अन्वये कक्ष-७ चे तपासावर घेण्यात आला व सदर गुन्हयात ताब्यातील परदेशी इसमास अटक करण्यात आले होते. आरोपीत इसम दिनांक १२/१२/२०२१ ते दिनांक २४/१२/२०२१ रोजीपर्यंत पोलीस कस्टडीत होता. त्यादरम्यान त्याचेकडुन खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**अटक आरोपी नांव व पत्ता :-**

**SERGIEV VENTSISLAV DANCHOV, Address – City – Sofia, Country – Bulgari**

**जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत-**

८५०० EURO चलन (**भारतीय चलन ७,०५,५००/रूपये**), भारतीय चलन १४,५३०/-, लॅपटॉप, डेबीट कार्ड, ओटीजी/युएसबी केबल, कार्ड रिडर/राईटर, स्पीकर व वायर, **DEEP INSERT SKIMMER**.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री. मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. विरेश प्रभु, पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. निलोत्पल, सहाय्यक पोलीस आयुक्त(डि-पूर्व) श्री. नितीन अलकनुरे, **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मनिष श्रीधनकर** यांचे मार्गदर्शनाखाली **महिला पोलीस निरीक्षक प्रिया थोरात**, **पोलीस निरीक्षक सुधीर जाधव**, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोगसिद्ध ओलेकर, **पोलीस उप निरीक्षक रामदास कदम**, निलेश चव्हाण, अतिष लोहकरे, स्वप्निल काळे, पोलीस हवालदार राजेंद्र शिंदे, शशिकांत कांबळे, पोलीस नाईक प्रमोद जाधव, गौरव सोनवणे, पोलीस शिपाई लुकमान सय्यद, विकास होनमाने, जितेंद्र पाटील, गणेश पाटील यांचेसह पोलीस नाईक चालक राजाराम कदम, पोलीस शिपाई चालक दिलीपराव राठोड यांनी पार पाडली आहे.

*****D-1/96/2021*****